**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत स्वयंसेवी संस्थांच्या तांत्रिक सहभागातून पथदर्शी सुक्ष्म पाणलोट विकास राबविणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१३/प्र.क्र.२७/रोहयो-१,
नियोजन विभाग (रोहयो) मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : १५ मार्च, २०१३.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्यातील जवळजवळ ८२% क्षेत्र हे कोरडवाहु असून, भारत सरकारने राज्यातील ३५५ तालुक्यापैकी १४९ तालुके अवर्षण प्रवणक्षेत्र म्हणूनवर्गीकृत केलेले आहेत. राज्यात खरिप हंगामात मुख्यत्वे नैऋत्य मोसमी वा-या पासुन पाऊस मिळतो. हा पडणारा पाऊस जर पाऊस कमी झाला किंवा त्याच्या मध्ये खंड पडला तर शेती उत्पादनावर परिणाम होतो. तसेच अनियमित पावसामुळे तयार होणा-या प्रश्नावर दीर्घ कालीन उपाय म्हणून पाणलोट क्षेत्रविकास कार्यकम हा अत्यंत महत्वाचा आहे. राष्ट्रीय पर्जन्याधारित क्षेत्र प्राधिकरण (NRAA), नियोजन विभाग, नवी दिल्ली यांनी महाराष्ट्रासारख्या राज्याकरिता पाणलोट विकासाचा कार्यक्रम मोठया प्रमाणात हाती घेण्याची शिफारस केलेली आहे आणि त्यानुसारच भारत सरकारने कोरडवाहु क्षेत्राच्या सर्वांगिन व शाश्वत विकास होणेसाठी पाणलोट विकासाचा एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम मोठ्या प्रमाणात सुरु केलेला आहे.

महाराष्ट्र राज्य हे पाणलोट विकास कार्यक्रमाचे आद्यप्रवर्तक असून राज्यामध्ये सन १९८० व १९९०मध्ये रोहयो व इतर योजनांच्या निधीतून बरीच गावे पाणलोट विकासाच्या माध्यमातून विकसित झालेली आहेत. सन १९९२ पासून शासनाने राज्यामध्ये मृद व जलसंधारण कामासाठी कृषि विभाग, सामाजिक वनीकरण आणि लघुपाटबंधारे व भूजल सर्वेक्षण यंत्रणा हे विभाग एकाच,जेणेकरुन एकात्मिक पाणलोट विकास साध्य होईल. रोहयो अंतर्गत उपलब्ध असलेल्या निधीचा वापर मोठया प्रमाणात करण्यासाठी वर नमूद केलेले तीनही विभाग एकाच सचिवांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दिनांक ५ ऑगस्ट, १९९२ पासून आणलेली आहेत. तसेच शासनाने रोहयो अंतर्गत उपलब्ध निधीपैकी ५०% निधी हा मृद व जलसंधारण कामाकरीता वापरणेबाबत आदेशित केले होते. या प्रमाणे राज्य रोहयो निधीतून पाणलोट विकास कार्यक्रम राबविण्यात येत होते.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत पाणलोट विकास राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये दिनांक १.४.२००८ पासून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना लागू केली आहे. राज्य रोहयो मध्ये मृद व जल संधारणाची ५०% कामे हाती घेणेची अट या कार्यक्रमात ठेवणेत आलेली नाही. या योजनेमध्ये भारत सरकारने परिशिष्ट १ नुसार मान्यता दिलेल्या उपक्रमातून (कामाच्यायादीतून ) कोणती कामे प्राधान्याने हाती घ्यावीत हे ठरविण्याची मुभा ग्रामपंचायतीला दिलेली आहे. मागील २ वर्षापासून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत हाती घ्यावयाच्या कामांच्या प्रकारामध्ये वाढ झालेली आहे. तथापि, एकंदर असे दिसून येते की, ग्रामपंचायत स्तरावर केवळ सिंचनाच्या विहिरींची कामे मोठया प्रमाणात हाती घेतल्यामुळे योजनेअंतर्गत ६०:४० अकुशल कुशलचे प्रमाण विस्कळीत झालेले आहे. तसेच ही कामे विखुरलेल्या स्वरुपात आणि एकात्मिक आराखडा तयार न करता हाती घेतली असल्यामुळे मृद व जलसंधारण आणि वैरण विकासामध्ये अपेक्षित परिणाम दिसून येत नाही.

केंद्र शासनाच्या नविन कार्यान्वयीन मार्गदर्शक सुचना- २०१३ च्या परिच्छेद ६.४ नुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये कोणते उपक्रम हाती घ्यावेत याबद्दल नमुद केलेले आहे.सद्या राज्यात दुष्काळी परिस्थिती उद्भवली असून काही तालुक्यात त्याची तीव्रता भीषण स्वरुपात जाणवत आहे, त्यामुळे उन्हाळी हंगामात मजुरांना मोठया प्रमाणात कामे देणेअपेक्षित आहे. त्याकरिता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये खालील कामे घेणे आवश्यक आहे

१) लोकांना मोठया प्रमाणात रोजगारउपलब्ध करुन देता येईल अशी कामे.

२) दुष्काळी परिस्थितीवर दीर्घकालीन उपाययोजना करण्यास उपयुक्त ठरतील अशी कामे.

वरिल दोन्ही निकष पुर्ण करणारी आणि यावर उत्तम पर्याय म्हणजे एकात्मिक पाणलोट विकास कामे हाती घेणे हे असेल.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये सहाय्यकारी (Relief work) कामे हाती घेणेच्या दृष्टिकोनाऐवजी एकात्मिक नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनाची (Integrated Natural Resource Management) कामे हाती घेणे आवश्यक आहे. या योजनेमध्ये कामे हाती घेताना वैयक्तिक आणि एकसारखी नमुनेदार साहाय्यकारी कामे (Relief Work) घेणेच्या पध्दतीत बदल करुन एकात्मिक नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनाची कामे यथार्थदर्शी, नियोजनबध्द आणि सर्वांगीक -विकास व पडणा-या पावसाचे पाणी उपयोगात आणणेसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत पाणलोट विकासाचे तत्व केंद्रभागी असणे आवश्यक आहे जेणेकरुन, पर्जन्याधारीत शेतीच्या उत्पादकतेत व गरीब जनतेच्या उत्पन्नात शाश्वत वाढ होईल.

**तथापि**, सर्व मार्गदर्शक सुचनामध्ये मृद व जलसंधारणाची कामे हाती घेणेबाबत विशेष जोर देवूनही प्रत्यक्षात ही कामे प्राधान्याने होत नाहीत. या संबंधाने कारणमिमांसा केली असता असे दिसुन येते की, क्षेत्रीयस्तरावर पाणलोट आधारित विकास तसेच अंदाजपत्रके तयार करण्यासाठी पुरेसा तांत्रिक कर्मचारीवर्ग उपलब्ध नाही. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ग्रामपंचायतीने राबविणे अपेक्षित आहे. त्यासाठी पंचायत समिती स्तरावरील तांत्रिक कर्मचारी वर्गाला पाणलोट कामासाठी कामाचे नियोजन, अंदाजपत्रके तयार करणे व कामाची स्थळ निश्चिती करणे इ. बाबतचे तांत्रीक ज्ञान/कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे म्हणून यावर उपाय म्हणजे या कामाची अंमलबजावणी ग्रामपंचायत स्तरावर ठेवुन. जोपर्यन्त पंचायत समितीचे तांत्रिकदृष्टया सक्षमीकरण होत नाही तो पर्यन्त त्यांना बाहयस्थ पध्दतीने तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे उचित होईल.

केंद्र शासनाच्या नविन कार्यान्वयीन मार्गदर्शक सुचना -२०१३ (प्रकरण-१७) मध्ये स्वयंसेवी संस्थाची ( Civil Society Organization) सहभागी तत्वावर तांत्रिक आधार घेणेबाबत तरतुद आहे. राज्यातील जालना जिल्ह्यातील भोकरदन व जाफ्राबाद तालुके आणि परभणी जिल्ह्यातील पालम तालुक्यात स्वयंसेवी संस्थाना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनामध्ये सहभागी तत्वावर पाठबळ घेणेत आले आहे. तसेच या कामाचे परिणाम सुध्दा प्रोत्साहनात्मक दिसुन आले आहेत. अशा स्वयंसेवी संस्थाना त्यांचे पाठबळासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या निधी व्यतिरिक्त इतर संस्थांतून (नाबार्ड इत्यादी) योजनेतुन निधी देणेत आला आहे. वरील पार्श्वभुमीवर शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

## <u>शासन निर्णय :</u>

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रत्येक दुष्काळी जिल्हे किंवा ज्या जिल्ह्यात मजुरांची कामाची मागणी आहे अशा जिल्ह्यातील १० ते १५ ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात (साधारपणे ५,००० ते ७,५०० हेक्टर क्षेत्र ) पाणलोट क्षेत्र विकसित करण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच सदर पाणलोट विकासाचे काम एक पथदर्शी प्रकल्प म्हणुन कोंकण विभागातील ठाणे, नाशिक विभागातील नाशिक, अहमदनगर व नंदूरबार औरंगाबाद विभागातील हिंगोली, लातूर, बीड, व उस्मानाबाद, पुणे विभागातील पुणे, सातारा, सांगली व सोलापूर, अमरावती विभागातील बुलढाणा, वाशिम व यवतमाळ, अशा एकूण पंधरा ठिकाणी एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत वर्गीकृत केलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या यादी **क्रमांक-अ** व यादी **क्रमांक- ब** तसेच State Resource Organization (SRO) यांच्यामधील स्वयंसेवी संस्थांच्या तांत्रिक सहकार्याने राबविण्यास शासन मान्यता देत आहे.

**१. प्रकल्प अंमलबजावणीची कार्यपद्धत -**

**अ. <u>जिल्हास्तर समिती</u>**

या कार्यक्रमाची अंमलबजवणी जिल्ह्यातकरण्यासाठी जिल्हास्तरावर खालीलप्रमाणे समितीची नियुक्ती करण्यात येत आहे:-

| | |
|---|---|
| १. जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी ) | - अध्यक्ष |
| २. सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.) | - उपाध्यक्ष |
| ३. प्रकल्प संचालक (जि.ग्रा.वि.यं.) | - सदस्य |
| ४. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | - सदस्य |
| ५. वरिष्ठ भु-वैज्ञानिक(भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा) | - सदस्य |
| ६. उप मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. | - सदस्य |
| ७. विभागीय वन अधिकारी (वनजमिनीवरीलकामासाठी) | - विशेष निमंत्रित |
| ८.उपजिल्हाधिकारी (रोहयो) | - सदस्य सचिव |

**<u>ब. जिल्हास्तर समित्यांच्या जबाबदा-या</u>**

जिल्हास्तर समितीच्या जबाबदा-या खालीलप्रमाणे असतील.

१. पथदर्शी प्रकल्पासाठी खालील निकषांचे आधारे कार्यक्रम अंमलबजावणीसाठी ग्रामपंचयतीची निवड करणे.

**निकष** -

अ) पाणलोट प्रकल्पात सुक्ष्म पाणलोटाचे सर्वसाधारणपणे सरासरी ५०० हेक्टर क्षेत्र असणा-या १० ते १५ ग्रामपंचायतीचा समावेश असावा.

ब) ग्रामपंचायतीची निश्चिती एक किंवा दोन टप्प्यात करावी. पहिल्या सभेत एकाच टप्प्यात सर्व ग्रामपंचायतीची निवड करण्याची आवश्यकता असणार नाही.

२. कार्यक्रम सुरु करण्यासाठी ग्रामसभा / ग्रामपंचायातीची सहमती मिळणेसाठी मदत करणे.

३. कार्यक्रमासाठी यथायोग्य तांत्रीक पाठबळ पुरविणा-या स्वंयसेवी संस्थाची भागिदार म्हणुन निवड करणे.

४. तांत्रीक पाठबळ पुरविणा-या स्वंयसेवी संस्थाच्या कामाची देयके वेळेत व कामाच्या प्रमाणात होत आहेत याची खात्री करणे.

५. प्रकल्पात जेथे शक्य असेल तेथे एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाची सांगड (Convergence) घालणे.

६. हा पथदर्शी प्रकल्प यशस्वी करण्यासाठी आवश्यक असल्यास, या मार्गदर्शक सुचनांचा आत्मा कमी न करता आवश्यकतेनुसार किरकोळ अनुषंगीक सुधारणा/ फेरफार करणेचा निर्णय घेणे.

**क) ग्रामपंचायत निवडीचे निकष –**

ग्रामपंचायतीची निवड करताना खालील बाबी विचारात घ्याव्यात :-

१) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत संबंधीत ग्रामपंचायती कडील मजुरांची उपलब्धता व येणा-या महिन्यात मजुरांकडून कामासाठी होणारी अपेक्षित मागणी विचारात घ्यावी (अति महत्वाचे).

२) पाणलोट विकासासाठी डोंगराळ व हलक्या जमिनी असणारा भाग, जेणेकरुन या भागात कामे झाल्यानंतर तात्काळ परिणाम दिसून येतील.

३) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, कृषि विभाग व उपग्रहाद्वारे मिळालेली छायाचित्रे यानुसार प्राधान्यक्रमांचे पाणलोट निवड करणे आवश्यक राहील.

४) एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत निवडलेली गावे, ज्या ठिकाणी एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची सांगड (Convergence) घालून गावातील सर्व कामे पूर्ण होतील अशा ग्रामपंचायती तसेच अमरावती विभागात CAIM प्रकल्पांतर्गत निवडलेली गावे /ग्रामपंचायतीचे कार्यक्षेत्र या कार्यक्रमासाठी निवडण्यात यावे.

५) तसेच स्वयंसेवी संस्थेने शिफारस केलेल्या ग्रामपंचायती तसेच संस्थांची यापुर्वीची गावाची ओळख आणि त्यांना कामांची अंमलबजावणी करणे सोईस्कर असतील अशी गावे तसेच उपरोक्तपैकी निकष क्र. १ व २ पूर्ण करणारी गावे या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी निवडण्यात यावीत.

**ड) स्वयंसेवी संस्थांची निवड-**

सदरचा कार्यक्रम हा पथदर्शी प्रकल्प म्हणून सन २०१३ च्या उन्हाळी हंगामात राबविण्याचा असून प्रकल्पातील कामे तातडीने सुरु करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची निवड एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम राबविण्यासाठी **वर्गीकृत** (Empanelment) केलेल्या **यादी अ व ब तसेच State Resource Organisation (SRO)** मधुन निवडण्यात यावी. सदर संस्थांची यादी वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, कृषि आयुक्तालय, मध्यवर्ती इमारत,पुणे-१ कार्यालयात तसेच नियोजन विभाग, रोजगार हमी योजनाच्या www.mahaegs.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात येईल.

२. उपरोक्त यादीमधून स्वयंसेवी संस्थांची निवड करताना यादीपैकी प्रथम जिल्हयात पूर्वीपासून कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थाच्या निवडीला प्राधान्य देण्यात यावे. जर या संस्था त्या जिल्हयांत काम करावयास इच्छूक नसतील तर शेजारच्या जिल्हयांतील किंवा महसूल विभागातील स्वयंसेवी संस्थांचा प्रकल्प राबविण्यासाठी विचार करणेस हरकत नाही. ज्यामुळे या संस्थांचा स्थानिक परिस्थितीशी असलेला परिचय प्रकल्प यशस्वी होण्यासाठी होईल.

३. केंद्र किंवा राज्य शासनाने बंदी घातलेल्या (blacklisted) संस्थांचा निवडीमध्ये सहभाग नसावा

४ प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी संस्थाची निवड करण्यासाठी शक्यतो ३ ते ५ संस्थांना पाचारण करणेत यावे, जेणेकरुन उचीत तुलनात्मक आणि योग्य स्पर्धा होऊन चांगल्या संस्थांची निवड होईल.

जिल्हयांमध्ये हाती घ्यावयाची कामे चर्चा करुन स्वयंसेवी संस्थांना राबविणेसाठी देण्यात यावीत. तसेच **एका स्वयंसेवी संस्थेस ३ ते ५ सुक्ष्म पाणलोटापेक्षा जास्त पाणलोट (सर्वसाधारणपणे १५०० ते २५०० हे. क्षेत्र) अंमलबजावणीसाठी दिले जाणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.** तसेच कामाचे वाटप अशाप्रकारे करावे, जेणेकरुन एका स्वयंसेवी संस्थेला दिलेले सुक्ष्म पाणलोट (उदा. ३ सूक्ष्म पाणलोट) हे शक्यतो एकमेकांच्या जवळ असावेत, जेणेकरुन स्वयंसेवी संस्थेकडील कर्मचारी वर्ग त्यांना प्रकल्प कामासाठी लावण्यास त्यांना अडचण निर्माण होणार नाही आणि प्रकल्प यशस्वी होण्यास बाधा येणार नाही.

**इ) स्वयंसेवी संस्थांची जबाबदारी-**

१) सुक्ष्म पाणलोटांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) शास्त्रोक्त पध्दतीने आणि पाणलोट विकास तत्वानुसार ( माथा ते पायथा) " **परिशिष्ट अ** " मध्ये दिलेल्या प्रकरणाप्रमाणे मराठीत व इंग्रजी भाषेत तयार करुन सादर करणे.

२) ग्रामपंचायतींना मृद व जलसंधारण कामासंदर्भात तसेच जल, जंगल, जमीन यांच्या जबाबदार आणि शाश्वत (sustainable) वापराबाबत माहिती देऊन मानसिकदृष्टया तयार करणे तसेच या कामामुळे होणारे फायदे आणि ग्रामपंचायतीची जबाबदारी काय राहील याबाबत माहिती देणे.

३) कामांचे मोजमाप घेण्यासाठी गावातील तरुणांची तांत्रिक क्षमता तयार करणे. गावातील लोकांची पाणलोट विषयासंदर्भातील तांत्रिक क्षमता वाढविणे.

४) काम सुरु करण्यासाठी कामाची आखणी करण्यास मदत करणे तसेच काम प्रगती पथावर त्यांनी तयार केलेल्या DPR नुसार कामे होत आहेत याबाबत विभागाच्या अधिका-यांसोबत देखरेख करणे. DPR तयार करतांना स्वयंसेवी संस्थांना नेमुन दिलेल्या पाणलोट क्षेत्राचे विविध नकाशे उदा.Cadastral, Drainage map, Slope map, Soil map, Land use map, Ground water map प्रचलित पध्दतीने वापरावे.

**फ) स्वयंसेवी संस्थांना करावयाचे प्रदान व त्याची पध्दत-**

१) स्वयंसेवी संस्थांना एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमाच्या धर्तीवर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी रु.१२०/- प्रती हेक्टर या मापदंडाप्रमाणे मानधन देण्यात येईल.

२) याशिवाय स्वयंसेवी संस्थांना जनजागृती करणे, प्रकल्पाची अंमलबजावणी करतांना तांत्रिक मार्गदर्शन करणे आणि कामाची आखणी करुन देणे या कामासाठी रु.३०/- प्रती हेक्टर याप्रमाणे मानधन देण्यात येईल.

३) स्वयंसेवी संस्थांना उपरोक्त मानधन खालीलप्रमाणे देण्यात यावे :

अ) अनुज्ञेय मानधनाच्या १० % रक्कम उपजिल्हाधिका-यांनी कार्यारंभ आदेश दिल्यानंतर अदा करावी.

ब) सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार केल्यानंतर ५०% रक्कम अदा करावी.

क) कामाचे अंदाजपत्रक संस्थांनी सादर केल्यानंतर ३०% रक्कम अदा करावी.

ड) प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्यानंतर १०% रक्कम अदा करावी.

४) जनजागृती, तांत्रिक मार्गदर्शन करणेची कामे पूर्ण केल्यानंतर संस्थेस द्यावयाची रक्कम रु.३०/- प्रति हेक्टर ही केलेल्या कामाचा अहवाल व त्याचे फोटोग्राफ्स प्राप्त झाल्यानंतर त्वरीत अदा करण्यात येईल.

५) स्वयंसेवी संस्थाना द्यावयाची रक्कम ही योजनेच्या ६% प्रशासकीय निधीसाठी उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावी. ही रक्कम एकतर जिल्हाधिकारी यांचेमार्फत किंवा तालुका स्तरावर गट विकास अधिकारी यांचेमार्फत संबंधित संस्थेस अदा करण्यात यावे. उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी ही रक्कम स्वयंसेवी संस्थांना वेळेवर अदा केली जात आहे याची खात्री करावी.

६) प्रकल्पाचे काम टप्पेनिहाय करणेत येईल जेणेकरुन स्वयंसेवी संस्थांना द्यावयाची रक्कम सातत्याने त्यांना मिळत जाईल. सदरचा प्रकल्प हा लहान असल्यामुळे स्वयंसेवी संस्थांची रक्कम कारणाशिवाय प्रलंबित राहणार नाही व रक्कम वितरीत करण्याची पध्दत साधी आणि पारदर्शक असणे आवश्यक आहे. कारणाशिवाय जास्तीचे अहवाल स्वयंसेवी संस्थांकडून मागविणे म्हणजे अनावश्यक कागदी काम आणि स्वंयसेवी संस्थाना जास्तीचा खर्च होईल. एखाद्या स्वयंसेवी संस्थेची त्यांच्या मोबदल्याबद्दल तक्रार असेल

७) तर, जिल्हाधिकारी यांनी ती तात्काळ विचारात घेऊन निवारण करावी,जेणेकरुन स्वयंसेवी संस्थांना लहान प्रकल्प अंमलबजावणी करण्यास प्रोत्साहन मिळेल.

८) स्वयंसेवी संस्थांना बाह्य संस्थेकडून रुपये १५०/- प्रति हेक्टरपेक्षा जास्त अतिरिक्त निधी घेण्यास मान्यता असेल ,जेणेकरुन गावांत चांगल्या दर्जाची कामे होणे तसेच एकात्मिक पाणलोट विकास अतिरिक्त कामे हाती घेता येतील.

**ग. कार्यक्रम अंमलबजावणीची पध्दत-**

**१. जिल्हा समितीच्या पहिल्या सभेत स्वंयसेवी संस्था आणि ग्रामपंचायतीची निवड तात्पुरत्या स्वरुपात करण्यात यावी. जेव्हा कधी आवश्यकता असेल त्यावेळी वेळ वाचविणेसाठी समितीने परिसंचारण (Circulation) पध्दतीने निर्णय घ्यावा.**

**२. स्वंयसेवी संस्था ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी / तांत्रीक अधिकारी यांचे समवेत ग्रामपंचायतीस भेट देवुन ग्रामसभा/ ग्रामपंचायतीचे ठराव घेण्यास मदत करतील. ठरावात गावात ग्रामपंचायत काम करेल व स्वंयसेवी संस्था, प्रकल्पाचा**

३. सविस्तर प्रकल्प अहवाल , जनजागृती आणि तांत्रिक सहाय्य करतील असे स्पष्ट करण्यात यावे.

४. पथदर्शी पाणलोट प्रकल्प सुरु करण्यासाठी ग्रामपंचायतीचा ठराव प्राप्त करणे आवश्यक आहे.

५. जर,सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) ग्रामपंचायतीचा ठराव (त्यानंतर ग्रामसभेचा ठराव घेवून) न घेता सुरु केला आणि जर ग्रामपंचायतीने प्रकल्प नाकारला तर त्यावरील खर्च निष्फळ जाईल, म्हणुन ग्रामपंचायत ठराव प्राप्त झालेनंतर स्वंयसेवी संस्थेस कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच त्यानंतर संपन्न होणा-या ग्रामसभेचा ठरावसुध्दा तात्काळ मिळविणे आवश्यक राहील.

६. सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) संपुर्ण सुक्ष्म पाणलोटासाठी तयार करण्यात यावा. यामध्ये साधारणपणे एक ग्रामपंचायतीचे क्षेत्र किंवा अंशतः क्षेत्राचा समावेश असेल. तथापि, सुक्ष्म पणलोटाचे क्षेत्र जर एकाहुन अधिक ग्रामपंचायत क्षेत्रात येत असेल तर कामे शास्त्रोक्त पध्दतीने होणेसाठी दोन्ही ग्रामपंचायत क्षेत्राचा समावेश करावा.

७. व्यावहारिक दृष्टिकोनातुन प्रत्यक्ष कामे पुर्ण करण्यासाठी क्षेत्राचे टप्पे तयार करणे आवश्यक राहील. यामध्ये नेट प्लँनिंग (सर्व्हे / गट नं. प्रमाणे, एक ऐकर हेक्टर किंवा कमी क्षेत्राच्या भौगोलिक परिस्थितीचा व जमीन मालकाच्या आर्थिक सामाजिक स्थितीचा विचार करावा), अंदाजपत्रकास तांत्रीक व प्रशासकीय मान्यता देणेसाठी ५० हेक्टर क्षेत्र मर्यादेत किंवा रु. ६.०० लाख किंमतीचे किंवा त्याहुनही कमी क्षेत्राचे ( २५ ते ४० हे.) भाग करावेत. तसेच यासाठी MIS मध्ये संवतत्र कामाचा संकेत नंबर असेल. यामुळे कामे लवकर सुरु करणे व पुर्ण करुन पुर्णत्वाचे दाखले देणे सोईचे होईल. प्रत्येक कामासाठी स्वंतत्र पुर्णत्वाचा दाखला देणे आवश्यक राहील. कामांची नोंद MIS मध्ये Water Conservation And Water Harvesting या वर्गवारी करणेत यावी.

८. प्रकल्पातील कामे " **माथा ते पायथा** " या तत्वानुसारच हाती घेणेत यावीत.

**ह. अंमलबजवणी करणारी यंत्रणा आणि तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देणे-**

१. या प्रकल्पाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा ग्रामपंचायत असेल. प्रकल्पातील कामांना प्रशासकीय मान्यता संबंधित गट विकास अधिकारी देतील. कामे जरी ग्रामपंचायत मार्फत होणार असली तरी या कामांना तांत्रीक मान्यता संबंधीत तालुक्याचे तालुका कृषि अधिकारी किंवा पाणलोट क्षेत्राचे ज्ञान असलेले इतर तत्सम अधिकारी देतील. संबंधित जिल्ह्याचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी

२. तालुका कृषि अधिकारी हे वेळेत कामांना तांत्रीक मान्यता देतात की नाही ? हे पहावे. कामावरील मजुरांची हजेरी ग्राम रोजगार सेवक (GRS) घेतील व संबंधीत ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक हजेरीपत्रकास साक्षांकित (Countersign) करतील. कामाची मोजमापे नेहमीप्रमाणे पंचायत समिती स्तरावरील तांत्रिक अधिकारी ( किंवा कंत्राटी पध्दतीवरील तांत्रीक अधिका-याने घेतलेल्या मोजमापास संबंधीत नियमीत अधिकारी साक्षांकित करतील) प्रचलित पध्दतीने घेतील. जर, काही प्रकल्प कृषि विभागास (संलग्न विभाग) अंमलबजवणी करण्यास द्यावयाचे असतील तर तसे करण्यास जिल्हा समितीला मुभा राहील. मात्र अशा कामांना तहसिलदार प्रशासकिय मान्यता देतील.

३. या प्रकल्पातील सर्व कामांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या सर्व अटी व शर्थी लागु रहातील.

**य. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ( कृषि विभाग) यांची प्रकल्पातील भुमिका-**

१. या प्रकल्पात जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची तांत्रीक पाठबळ (Technical Support) पुरविण्याबरोबरच प्रकल्प यशस्वी करुन शेतीची उत्पादकता सुधारणसाठी अत्यंत महत्वाची भुमिका राहील.
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे स्वतः या प्रकल्पांना भेट देतील किंवा त्यांचे हाताखालील वर्ग - १ दर्जाहुन कमी नसतील अशा अधिका-यामार्फत प्रकल्पातील कामांना भेट देतील.
३. पाणलोट प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी आवश्यकतेप्रमाणे लागणारे सर्व नकाशे स्वंयसेवी संस्थाना उपलब्ध करतील.
४. सदरचे प्रकल्प पर्जन्यश्रयी क्षेत्रासाठी खुपच उपयुक्त असल्याने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे संबंधित तालुका कृषि अधिकारी यांना कामांना तांत्रीक मान्यता देणेसाठी आवश्यक त्या सर्व सुचना निर्गमित करतील.

**ज. वन विभागाची भुमिका -**

काही वेळेस पाणलोटाचा वरचा भाग वन क्षेत्राखाली येतो, म्हणुन एकात्मिक पध्दतीने पाणलोट उपचारीत करण्यासाठी वन विभागाने आवश्यक ते सहकार्य देणे आवश्यक आहे. याबाबतचे सर्व मुद्दे जिल्हा समितीने सोडवावेत.

**झ. इतर महत्वाचे मुद्दे -**

१. हा प्रकल्प एक पथदर्शी असल्याने आणि येणा-या उन्हाळी हंगामात जास्तीत जास्त कामे पुर्ण होणेसाठी **प्रकल्पाचे काम दि. १५ एप्रिल २०१३ पुर्वी सुरु करणे आवश्यक राहील.**
२. पाणलोट कामाचे महत्व समजावे म्हणुन स्वंयसेवी संस्थानी ग्रामपंचायत सरपंच व सदस्य, ग्रामसेवक , ग्राम रोजगार सेवक आणि तांत्रीक अधिकारी यांना जवळच्या यशस्वी पाणलोटास भेट घडवुन आणावी.
३. कामाची सुरुवात चालु उन्हाळी हंगामात सुरु करावी .आवश्यकतेनुसार या कामाचा कालावधी पुढील हंगामापर्यंत वाढविणेत येईल.
४. कामाचा वेग वाढविणे, मापे घेणे व मजुरांची रक्कम अदा करणेसाठी सॉफ्टवेअर प्रणालीचा वापर करणे नियोजित असुन याबाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना स्वंतत्ररित्या कळविणेत येतील.
५. जिल्हाधिकारी यांनी आवश्यकता भासल्यास **रोहयो कायदा- कलम ६** अन्वये दिलेल्या शक्तीचा वापर करुन आवश्यक ते निर्देश संबंधित तांत्रिक विभागास व इतर अधिका-याना देतील.
६. स्वंयसेवी संस्था प्रकल्पाच्या कोणत्याही टप्प्यावर काम करताना ठरवुन दिलेल्या मानकापेक्षा कमी काम करत आल्याचे दिसुन आल्यास जिल्हाधिकारी त्यांचे देयक थांबवतील किंवा काम निलंबित
७. करतील. तसेच स्वंयसेवी संस्थाना त्यांचे म्हणणे जिल्हा समितीसमोर मांडणेची संधी देवुन आवश्यकता भासल्यास त्यांचेकडील प्रकल्प काढुन घेतील.
८. प्रकल्प यशस्वी होणेसाठी सर्व संबंधीतानी सहकार्य करणे अपेक्षित असेल.
९. प्रकल्पांतर्गत " **परिशिष्ट- क** " प्रमाणे भौगोलिक परिस्थिती व जमिनीचा उतार व तांत्रिक सुचनाप्रमाणे कामाचे नियोजन करावे.

**कामाची तपासणी -**

या प्रकल्पांतर्गत झालेल्या कामाची तपासणी शासन **निर्णय क्रमांक - मग्रारोहयो२०१२/प्र.क्र.०४/पुर्नबांधणी-३/रोहयो-१, दिनांक १३ जुलै २०१२ अन्वये** दिलेल्या प्रपत्रात खालील अधिका-यांनी करावी.

१. **राज्य स्तर,** - उपआयुक्त (कृषि), आयुक्त नरेगा कार्यालय ,नागपुर
२. **विभागस्तर** - अधिक्षक कृषि अधिकारी (मग्रारोहयो) विभागीय आयुक्त कार्यालय

३. **जिल्हास्तर** - अ.उपजिल्हाधिकारी (रोहयो), उप अभियंता (जल संपदा) जिल्हाधिकारी कार्यालय
ब.कृषि अधिकारी (वर्ग-२) मनरेगा कक्ष ,जि.प.कार्यालय

४. **तालुका स्तर**- तहसिलदार/ गट विकास अधिकारी व तालुका कृषि अधिकारी

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२०१३०३२९१६२४३००८१६ हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

वि. गिरिराज

(व्ही गिरिराज)
प्रधान सचिव (रोहयो)

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव
४. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
५. अतिरिक्त मुख्य सचिव
६. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०००३२
७. सर्व विभागीय आयुक्त.
८. सर्व जिल्हाधिकारी
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०. आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य , पुणे
११. सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
१२. कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई — ४०००३२ (महाऑनलाईनवर प्रसिध्दीसाठी)
१३. सर्व उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी नियोजन विभाग (रोहयो)
१४. सारसंग्रह रोहयो — १ / निवडनस्ती (रोहयो.१)

## परिशिष्ट अ

### सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे

### भाग – १

| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पान नं. |
|---|---|---|
| १. | कार्य सारांश | |
| २. | पकल्पाची पार्श्वभुमी व प्रस्तावना | |
| ३. | प्रकल्पाची सर्वसाधारण माहिती | |
| ४. | पायाभूत सर्वेक्षण | |
| ५. | प्रकल्पाचे नियोजन व कृति आराखडा | |
| ६. | क्षमता बांधणी आराखडा | |
| ७. | कार्यक्रम अंमलबजावण् टप्पे व आर्थिक कार्यक्रम | |
| ८. | प्रकल्पाचे अपेक्षित परिणम (Expected outcomes) | |
| ९. | पाणलोटाचे नकाशे | |

### भाग – २

भाग २ मध्ये शेतकरी निहाय कामाचे नेट प्लॅनिंगची माहिती द्यावी. (एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाप्रमाणे)

भाग-३

भाग ३ मध्ये कामानिहाय अंदाजपत्रके सादर करावीत. अंदाजपत्रके तयार करणेसाठी ग्राम विकास व जलसंधारण विभागाचा दि.३१/५/२०१२ च्या शासन निर्णयातील मापदंड वापरावेत. कामाची अंदाजपत्रके शक्यतो सॉफटवेअरचा वापर करुन करण्यात यावीत.

**<u>परिशिष्ट ब</u>**

स्वंयसेवी संस्थाना कार्यारंभ आदेश देणेचा नमुना (ग्राम पंचायत ठराव प्राप्त झालेनंतर)

प्रति,

-------------

-------------

शासन निर्णय क्र. दि. च्यानुसार, जिल्हा समिती. जि.------ खाली नमुद केलेप्रमाणे पाणलोट प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे. तांत्रिक पाठबळ पुरविणे आणि जनजागृती कार्यक्रम राबविणेची जबाबदारी आपणावर सोपविणेत येत आहे.

| तालुका / तहसिल | ग्रामपंचायतीचे नाव | अंमलबजावणी यंत्रणा | सुक्ष्म पाणलोटाची नावे (कृषि विभाग / भुजल सर्वेक्षण यंत्रणानुसार) |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

२. प्रकल्पासंबंधी पुढील कार्यवाहीकरिता आपण संबंधित तहसिलदार / गट विकास अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

३. कामाचा मोबदला आपणाकडुन प्रकल्पातील केलेल्या कामाचा अहवाल तहसिलदार / गट विकास अधिकारी यांना सादर केल्यानंतर शासन निर्णयातील तरतुदीनुसार वेळोवेळी प्रकल्पातील कामे पूर्ण केलेप्रमाणे ६ टक्के प्रशासकीय निधीमधुन अदा करण्यात येईल.

४. आपणासं याबाबत काही अडचण / शंका असल्यास कार्यालयीन वेळेत या कार्यालयात संपर्क साधणेत यावा.

५. प्रकल्पासाठी शासन निर्णयातील तरतुदीनुसार आपल्या परस्पर भुमिका आणि जबाबदाऱ्या असतील.

६. आपणास काही अडचणी अगद वाद असेल तर तुम्ही जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांचेशी संपर्क साधु शकता.

७. प्रकल्पाच्या कोणत्याही टप्प्यावर ठरवुन दिलेल्या मानकापेक्षा कमी काम करत आल्याचे दिसुन आल्यास जिल्हाधिकारी किंवा जिल्हा समितीस आपले तात्पुरते देयक थांबविण्याचा किंवा काम निलंबित करण्याचा अधिकार असेल. तसेच याबाबत अंतिम निर्णय घेणेपूर्वी तुम्हाला तुमचे म्हणणे जिल्हाधिकारी / जिल्हा समितीसमोर मांडणेची संधी देवुन कामाबाबत निर्णय घेतला जाईल.

८. कृपया या पत्रातील अटी व शर्थी मान्य असलेबाबत स्वाक्षरी करुन पोहोच द्यावी.

९. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.

दि. / /२०१३

उपजिल्हाधिकारी
तथा
सदस्य सचिव, जिल्हा समिती, --------

प्रत-

१. जिल्हा अधिकारी कृषि अधिकारी, ---------

२. तहसिलदार / गट विकास अधिकारी, ---------

३. तालुका कृषि अधिकारी,------------